




दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2026-28








अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २६०। किंमत - ४ रू । संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) । रविवार २५/१०/२०२६ । पाने- ६







# जरांगे-शिंदेंचे राजकीय नेतृत्व संपवण्याचा डाव?

## कथित ५०० कोटींच्या ऑडिओ क्लिपवरून पृथ्वीराज चव्हाणांचा खळबळजनक आरोप

मुंबई (वृत्तसंस्था)

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी समोर आणलेल्या कथित ५०० कोटी रुपयांच्या ऑडिओ क्लिपमुळे महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणावरून आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत असतानाच काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी या कथित क्लिपमागे मोठे राजकीय षड्यंत्र असल्याचा गंभीर आरोप केला आहे. मनोज जरांगे पाटील यांची प्रतिमा मलिन करण्याबरोबरच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे राजकीय नेतृत्वही संपवण्याचा हा सत्ताधाऱ्यांचा डाव असू शकतो, असा दावा चव्हाण यांनी केला. या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र फॉरेन्सिक आणि तांत्रिक तपासणी करून सत्य जनतेसमोर आणावे, अशी मागणीही त्यांनी केली.

कथित ऑडिओ क्लिपमुळे राज्यातील राजकीय वातावरण तापले असून, या वादात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे ज्येष्ठ नेते चंद्रकांत खैरे यांनीही उडी घेतली आहे. 'मनोज जरांगे यांना मोठे कोणी केले आणि आता त्यांना बाजूला करण्याचे प्रयत्न का होत आहेत?' असा सवाल उपस्थित करत त्यांनीही या प्रकरणाच्या निष्पक्ष चौकशीची मागणी केली आहे. त्यामुळे या कथित क्लिपमागील सत्य काय, तिचा राजकीय संदर्भ कोणता आणि या वादातून नेमके कोणाला राजकीय फायदा होणार, याबाबत चर्चांना उधाण आले आहे.

### फॉरेन्सिक तपासणीची मागणी



पृथ्वीराज चव्हाण यांनी या कथित ऑडिओ क्लिपच्या राजकीय परिणामांवर भाष्य करताना गंभीर प्रश्न उपस्थित केले. त्यांच्या मते, या प्रकरणाचा बारकाईने अभ्यास केल्यास त्यामागे मोठी राजकीय खेळी असल्याचा संशय निर्माण होतो. एका बाजूला मराठा आरक्षण आंदोलनाचे प्रमुख नेतृत्व म्हणून पुढे आलेल्या मनोज जरांगे पाटील यांची प्रतिमा डागाळून त्यांना समाजापासून दूर करण्याचा प्रयत्न आणि दुसऱ्या बाजूला खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचे नाव या प्रकरणात आल्याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची राजकीय कोंडी करण्याचा डाव, अशी शक्यता त्यांनी व्यक्त केली.

'एका दगडात दोन पक्षी मारण्याचा प्रयत्न' असल्याचे सांगत चव्हाण यांनी या कथित षड्यंत्रामागे नेमके कोण आहे आणि त्याला कोणाचे राजकीय पाठबळ आहे, हे निष्पक्ष तपासातूनच स्पष्ट होईल, असे म्हटले. मात्र, या आरोपांना अद्याप स्वतंत्र तपासातून पुष्टी मिळालेली नसल्याने ऑडिओ क्लिपची सत्यता आणि तिच्यामागील कथित राजकीय हेतू यांची पडताळणी होणे महत्त्वाचे ठरणार आहे.

या प्रकरणात केवळ राजकीय आरोप-प्रत्यारोप करून चालणार नाही, तर सरकारने तातडीने ठोस पावले उचलली पाहिजेत, अशी भूमिका चव्हाण यांनी मांडली. संबंधित ऑडिओ क्लिपची स्वतंत्र फॉरेन्सिक तपासणी, आवाजाची तांत्रिक पडताळणी आणि संभाषणाच्या सत्यतेची शहानिशा करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. क्लिपमधील संभाषण अस्सल आहे की त्यात फेरफार करण्यात आला आहे, त्याचा संदर्भ काय आहे आणि ती सार्वजनिक करण्यामागे कोणाचा हेतू आहे, या प्रश्नांची उत्तरे तपासातून मिळणे गरजेचे आहे. सरकारने वेळकाढूपणा न करता पारदर्शक पद्धतीने चौकशी करून जनतेसमोर वस्तुस्थिती मांडावी, अशी मागणी त्यांनी केली.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे ज्येष्ठ नेते चंद्रकांत खैरे यांनीही या वादावर प्रश्न उपस्थित केले. मनोज जरांगे पाटील यांचे नेतृत्व पुढे येण्यामागे कोणत्या राजकीय घडामोडी होत्या आणि आता त्यांना बाजूला करण्याची चर्चा का सुरू झाली आहे, याचा शोध घेतला पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले. या प्रकरणात कोणालाही दोषी ठरवण्यापूर्वी निष्पक्ष चौकशी होणे (पान २ वर)

# दुष्काळाच्या संकटाकडे दुर्लक्ष नको

## आ. सत्यजीत तांबेंची जिल्हाधिकाऱ्यांसोबत चर्चा



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- राज्यातील दुष्काळाची गंभीर परिस्थिती लक्षात घेता, आगामी उन्हाळ्याची वाट न पाहता प्रशासनाने आतापासूनच ठोस उपाययोजना कराव्यात. सध्याच्या राजकीय घडामोडींमध्ये दुष्काळासारख्या महत्त्वाच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष होता कामा नये, असे मत आमदार सत्यजीत तांबे यांनी व्यक्त केले. अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध प्रलंबित प्रश्नांबाबत त्यांनी आज जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांची भेट घेऊन चर्चा केली.

ऑक्टोबर महिन्यातच दुष्काळाची परिस्थिती गंभीर असेल, तर येणाऱ्या काळात परिस्थिती आणखी बिकट होऊ शकते. आगामी काळात पाऊस कमी झाल्यास संकट वाढण्याची शक्यता असल्याने दुष्काळग्रस्त गावांसाठी पाणीपुरवठा आणि जलसाठ्यांचे नियोजन तातडीने करावे, अशी मागणी त्यांनी केली. अल निनोच्या संभाव्य प्रभावाची गंभीरता लक्षात घेता नागरिकांनीही शेतीसाठी आणि पिण्यासाठी पाण्याची बचत करावी. संगमनेरमध्ये नियमित पाणीपुरवठा होत असतानाही पाण्याचा अपव्यय होत असल्याने त्यावर नियंत्रण आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

जलजीवन मिशनअंतर्गत अनेक योजना अपूर्ण असून, ठेकेदारांची कोट्यवधी रुपयांची देयके प्रलंबित आहेत. ८५ टक्क्यांपेक्षा अधिक काम पूर्ण झालेल्या आणि किरकोळ खर्चातून कार्यान्वित होऊ शकणाऱ्या योजनांची यादी तयार करावी. या योजना पूर्ण करण्यासाठी उद्ठ निधीतून कंपन्यांची मदत घ्यावी. तसेच दुष्काळ निवारणासाठी आमदार निधीतून २५ लाख रुपये खर्च करण्यासंदर्भातील शासनाच्या निर्देशांच्या अनुषंगाने आमदार निधीची मदतही या योजनांसाठी उपलब्ध करून देण्याचे नियोजन करावे, अशी सूचना तांबे यांनी केली.

वनविभागाच्या संगनमताने वृक्षतोड सुरू असल्याचा आरोप करत तांबे यांनी संगमनेर तालुक्यातील निमोण येथील प्रकरणाची माहिती दिली. याबाबत वनविभागाकडे लेखी तक्रार करण्यात आली आहे. एका बाजूला मोठ्या झाडांची तोड होत असताना, दुसरीकडे रोजगार हमी योजनेतून नवीन झाडे लावण्यासाठी वनविभागाच्या जागेवरील ना-हरकत प्रमाणपत्रे वेळेत मिळत नसल्याची बाबही त्यांनी मांडली. याची गंभीर दखल घेऊन वृक्षतोड रोखावी आणि वृक्षलागवडीला प्रोत्साहन द्यावे, अशी मागणी त्यांनी केली. (पान २ वर)






# डॉ. लहामटे विरूद्ध गायकर लढत रंगणार

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत अकोले तालुक्यात सोसायटी मतदारसंघातून आमदार डॉ. किरण लहामटे आणि जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष सीताराम पाटील गायकर यांची कन्या संजीवनी शिंदे यांच्यात सरळ लढत होत आहे. या लढतीकडे केवळ अकोलेच नाही तर संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. या निवडणुकीमुळे अकोल्याचे राजकारण ढवळून निघणार असून, याचे पडसाद निवडणुकीनंतरही स्थानिक राजकारणात उमटण्याची शक्यता आहे.

आमदार डॉ. लहामटे आणि सीताराम गायकर हे दोघेही राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) नेते आहेत. माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांचे या दोघांच्याही राजकीय वाटचालीत मोठे योगदान राहिले आहे. (पान ६ वर)

# ज्येष्ठ नेते भानुदास कोतकर यांचे निधन

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - अहिल्यानगरच्या राजकीय आणि सहकार क्षेत्रातील एक दिग्गज नेत्याचे निधन झाले. ज्येष्ठ नेते आणि कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती भानुदास एकनाथ कोतकर यांचं आज शनिवारी सकाळी निधन झाले. ते ७४ वर्षांचे होते.

मिळालेल्या माहितीनुसार, भानुदास कोतकर यांना सकाळी हृदयविकाराचा त्रास जाणवू लागला. त्यानंतर त्यांना तातडीने अहिल्यानगरमधील आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. कोतकर यांच्या निधनाची बातमी समोर येताच अहिल्यानगरच्या राजकीय वर्तुळात शोककळा पसरली आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती म्हणून त्यांनी काम पाहिलं होते. त्यांच्या निधनामुळे स्थानिक राजकीय आणि सहकार क्षेत्रातून हळहळ व्यक्त केली जात आहे. एका ज्येष्ठ नेत्याच्या निधनाने अहिल्यानगरने आपला महत्त्वाचा चेहरा गमावला आहे. त्यांचे जिल्ह्यातील अनेक नेत्यांसोबत व्यक्तीगत आणि राजकीय संबंध होते. त्यासोबतच नातेसंबंध देखील मोठे होते.



भानुदास कोतकर यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीत विविध महत्त्वाच्या पदांवर काम केले. नगर पंचायत समितीचे सभापती, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक, नगर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष आणि जिल्हा शहर काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून त्यांनी जबाबदाऱ्या सांभाळल्या. राजकारणासोबतच उद्योग क्षेत्रातही त्यांनी योगदान दिले. ते संदीप उद्योग समूहाचे संस्थापक होते. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नूतनीकरणात आणि विकासकामांमध्ये भानुदास कोतकर यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. शेतकऱ्यांना कृषी मालाच्या विक्रीसाठी अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या दृष्टीने त्यांनी प्रयत्न केले. त्यांच्या पुढाकारातून नगर तालुक्यातील नेप्ती उपबाजार समितीची निर्मिती झाल्याचे सांगितले जाते. तसेच चिचोंडी पाटील येथेही उपबाजार समितीसाठी जागा घेऊन ठेवण्यात आली होती.













# दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ!

मुंबई (वृत्तसंस्था)

संपूर्ण राज्यावर दुष्काळाचं सावट घोंगवतं. महाराष्ट्र दुष्काळामध्ये होरपळून निघत असताना सरकारकडून शेतकऱ्यांना मदतीचा हात दिला जात आहे. मुख्यमंत्री, दोन्हीही उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री आपल्या जिल्ह्याचा दुष्काळदौरे करत सरकारच्या माध्यमातून मदत करत आहेत. असं असताना आता दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांसाठीही सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालयाने, दुष्काळग्रस्त तालुक्यांतील विद्यार्थ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी परीक्षा शुल्कमाफीचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना फार मोठा दिलासा मिळाला आहे.परीक्षा शुल्कमाफीच्या निर्णयाची अंमलबजावणी अगदी प्रभावीपणे सुरू असून, आतापर्यंत तब्बल २ लाख ४० हजार ३६५ विद्यार्थ्यांनी परीक्षा शुल्काचा एकही रुपया न भरता 'झिरो चलन' सुविधेद्वारे परीक्षा अर्ज दाखल केले असल्याची माहिती उच्च- तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज दिली. उच्च- तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की, दुष्काळग्रस्त तालुक्यांतील विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणींमुळे शिक्षणात अडथळे येऊ नयेत. या उद्देशाने विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारू नये. असा निर्णय राज्य शासनाने घेतलाय. या निर्णयाची अंमलबजावणी सुरळीतपणे व्हावी आणि पात्र विद्यार्थ्यांना सवलतीचा लाभ मिळावा, यासाठी संचालनालय, विद्यापीठे आणि परीक्षा विभागाच्या स्तरावर आवश्यक यंत्रणा कार्यरत करण्यात आली आहे. या प्रक्रियेचा विभागाकडून सातत्याने आढावा घेतला जात आहे.विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरताना शुल्क भरावे लागू नये, यासाठी अर्ज प्रक्रियेत 'झिरो चलन' हा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्या पर्यायामुळे दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना कोणतेही परीक्षा शुल्क न भरता परीक्षा अर्ज दाखल करता येत आहे.

# सातबारा नोंदीतील सामायिक जमिनीच्या विक्रीसाठी संमती आणि मोजणीला प्राधान्य



मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्र सरकारने सामायिक जमिनीच्या खरेदी-विक्रीतील फसवणूक रोखण्यासाठी नवीन नियम लागू केले आहेत. आता सात वर्षांच्या नोंदीसाठी सर्व सहहिस्सेदारांची संमती अनिवार्य आहे.

महाराष्ट्रातील संयुक्त मालकीच्या जमिनीच्या खरेदी-विक्रीतील फसवणूक आणि वाद टाळण्यासाठी राज्य सरकारने नवीन नियम लागू केले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार जारी केलेल्या आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सुरू केलेल्या आदेशानुसार, सात-बारा (७/१२) जमीन अभिलेखात नोंद असलेल्या सामायिक जमिनीचा हिस्सा विकण्यासाठी विहित कागदपत्रे सादर करणे आवश्यक असेल. आवश्यक कागदपत्रांच्या अनुपस्थितीत, विक्रीची नोंदणी होणार नाही. महसूल विभागाच्या आदेशानुसार, जर जमीन विकणाऱ्या सहहिस्सेदाराने विक्रीच्या कागदपत्रांसोबत भूमी अभिलेख विभागाकडून प्राप्त केलेले अधिकृत मोजमाप प्रमाणपत्र म्हणजेच प्रत 'अ' सादर केले, तर इतर सहहिस्सेदारांच्या लेखी संमतीशिवाय किंवा ना हरकत प्रमाणपत्राशिवाय (एनओसी) देखील जमिनीच्या विक्रीची नोंदणी केली जाऊ शकते.जर संबंधित जमिनीचे अधिकृत मोजणी प्रमाणपत्र उपलब्ध नसेल, तर सात-बारा नोंदींमध्ये नोंद असलेल्या इतर सर्व सहहिस्सेदारांची लेखी संमती अनिवार्य असेल. याशिवाय, उपनिबंधकांना जमीन विक्रीच्या कागदपत्रांची नोंदणी करता येणार नाही. जमिनीचे भूखंड स्पष्टपणे ओळखणे आणि इतर भागधारकांना माहिती न देता होणारे व्यवहार रोखणे, हा या प्रणालीचा उद्देश आहे. सामायिक जमिनीच्या विक्रीदरम्यान इतर संबंधितांना माहिती न दिल्यामुळे अनेकदा कौटुंबिक वाद निर्माण होतात. अशा प्रकरणांमधील प्रदीर्घ कायदेशीर लढ्यांमुळे न्यायालयांवरील भारही वाढतो. महाराष्ट्र सरकारचा विश्वास आहे की, नवीन तरतुदींमुळे जमिनीच्या व्यवहारांमध्ये पारदर्शकता वाढेल आणि वाद कमी होण्यास मदत होईल.

# कुंभमेळ्याचं पावित्र्य राखण्यासाठी पंचवटी, रामघाट, कुशावर्त परिसरात मद्यविक्रीवर निर्बंध

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक : नाशिक येथे होणाऱ्या आगामी नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२६-२७ च्या पार्श्वभूमीवर रामघाट, पंचवटी आणि त्र्यंबकेश्वर येथील कुशावर्त तलाव परिसरातील मद्यविक्री दुकानांवर निर्बंध लादण्याच्या हालचालींना वेग आला आहे. कुंभमेळ्याचे धार्मिक पावित्र्य टिकवून ठेवण्यासाठी, तसेच सुरक्षितता आणि कायदा-सुव्यवस्थेच्या दृष्टीने या परिसरातील मद्यविक्रीवर मर्यादा घालण्याबाबत राज्य उत्पादन शुल्क विभाग व जिल्हा प्रशासनाने नाशिक महापालिकेकडे तातडीने अहवाल मागवला आहे. मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृहावर मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या आढावा बैठकीमध्ये रामघाट, पंचवटी तसेच कुशावर्त तलाव परिसरातील २ ते ३ किलोमीटरच्या क्षेत्रात मद्यविक्रीवर निर्बंध आणण्याबाबत चर्चा झाली होती.'महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९' च्या कलम १३९ मधील तरतुदींनुसार आदेश निर्गमित करण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे. या संदर्भात मुख्यमंत्र्यांनी निर्देश दिले होते. तसेच या प्रस्तावाच्या अनुषंगाने अंतिम निर्णय व अधिसूचना काढण्यापूर्वी गृह विभाग व राज्य उत्पादन शुल्क आयुक्त यांनी दोन महत्त्वाच्या मुद्द्यांवर स्पष्टता मागवली आहे. यात क्षेत्रीय अंतर व कालावधीवर भर देण्यात आला आहे. रामघाट, पंचवटी व कुशावर्त परिसरातील नेमक्या किती अंतराच्या (किलोमीटर) परिसरातील मद्यविक्री परवाने बंद ठेवायचे असून नमूद क्षेत्रातील मद्यविक्री दुकाने नेमकी किती कालावधीसाठी बंद अथवा निर्बंधात ठेवायची आहेत, या विषयावर महापालिकेकडून माहिती मागविण्यात असल्याचे समजते.

# महाराष्ट्रात राखेतून उभारणार महामार्ग
# ६.१७ कोटी मेट्रिक टनचा करार

नवी दिल्ली (वृत्तसंस्थ)

महाराष्ट्रातील द्रुतगती महामार्गाच्या बांधणीसाठी औष्णिक विद्युत केंद्रांमधून निर्माण होणाऱ्या राखेचा वापर करण्यात येणार आहे. तब्बल ६.१७ कोटी मेट्रिक टन राखेचा वापर करून विदर्भातील प्रमुख महामार्ग उभारण्यात येतील. त्यासाठी महानिर्मिती आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) यांच्यात सामंजस्य करार झाला आहे. ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या उपस्थितीत या करारावर शिक्कामोर्तब झाले. त्यामुळे आता राखेचा वापर पायाभूत सुविधांच्या विकासासाठी होईल.

महानिर्मितीसोबत झालेल्या करारासाठी एमसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड, महानिर्मितीचे संचालक (प्रकल्प) अभय हरणे, कार्यकारी संचालक (पर्यावरण) डॉ. नितीन वाघ, एमएसआरडीसीचे महाव्यवस्थापक (पर्यावरण) नरेंद्र टोके आदी उपस्थित होते. या करारामुळे महानिर्मितीच्या कोराडी, खापरखेडा आणि चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्रांमधील राखेचा वापर द्रुतगती महामार्गांसाठी आणि महत्त्वाच्या पायाभूत विकासासाठी करण्यात यार्ईल.महाराष्ट्रातील द्रुतगती महामार्गाच्या बांधणीसाठी औष्णिक विद्युत केंद्रांमधून निर्माण होणाऱ्या राखेचा वापर करण्यात येणार आहे. तब्बल ६.१७ कोटी मेट्रिक टन राखेचा वापर करून विदर्भातील प्रमुख महामार्ग उभारण्यात येतील. त्यासाठी महानिर्मिती आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) यांच्यात सामंजस्य करार झाला आहे. ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या उपस्थितीत या करारावर शिक्कामोर्तब झाले. त्यामुळे आता राखेचा वापर पायाभूत सुविधांच्या विकासासाठी होईल.

महानिर्मितीसोबत झालेल्या करारासाठी एमसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड, महानिर्मितीचे संचालक अभय हरणे, कार्यकारी संचालक (पर्यावरण) डॉ. नितीन वाघ, एमएसआरडीसीचे महाव्यवस्थापक नरेंद्र टोके आदी उपस्थित होते. या करारामुळे महानिर्मितीच्या कोराडी, खापरखेडा आणि चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्रांमधील राखेचा वापर द्रुतगती महामार्गांसाठी आणि महत्त्वाच्या पायाभूत विकासासाठी करण्यात यार्ईल.

# वीजेच्या लपंडावाला कंटाळून शेतकऱ्याचा आत्महत्येचा प्रयत्न



युवावार्ता (प्रतिनिधी)

गेल्या दोन महिन्यांपासून सुरू असलेल्या अनियमित आणि वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे त्रस्त झालेल्या अंभोळ आणि पैठण परिसरातील शेतकऱ्यांचा संताप अखेर गुरुवारी उफाळून आला. वीजपुरवठ्याच्या समस्येकडे वारंवार लक्ष वेधूनही तोडगा न निघाल्याने एका संतप्त शेतकऱ्याने थेट कोतूळ येथील महावितरणच्या उपकेंद्र परिसरात झाडाला दोर बांधून फाशी घेण्याचा प्रयत्न केला. उपस्थित शेतकऱ्यांनी वेळीच हस्तक्षेप केल्याने मोठा अनर्थ टळला. या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून, महावितरणच्या कारभाराविरोधात शेतकऱ्यांमधील नाराजी तीव्र झाल्याचे चित्र आहे.

अंभोळ आणि पैठण या गावांमध्ये गेल्या दोन महिन्यांपासून वीजपुरवठ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. वीज कधी येते, कधी जाते, तर कधी वारंवार होणाऱ्या खंडित पुरवठ्यामुळे शेतीच्या कामांचे नियोजन पूर्णपणे कोलमडले आहे. हातातोंडाशी आलेली पिके पाण्याअभावी धोक्यात आली असून, शेतकऱ्यांना आर्थिक नुकसानीची भीती सतावत आहे. या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्याऐवजी परिस्थिती जैसे थे राहिल्याने शेतकऱ्यांचा संयम सुटत चालला होता.

वीजपुरवठ्याच्या या गंभीर प्रश्नावर अवघ्या आठ दिवसांपूर्वी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी आमदार वैभव पिचड आणि आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या प्रमुख उपस्थितीत महावितरणच्या अधिकाऱ्यांची विशेष बैठक झाली होती. या बैठकीत पालकमंत्र्यांनी दोन दिवसांत वीजपुरवठा सुरळीत करण्याचे स्पष्ट निर्देश दिल्याचे सांगण्यात येते. मात्र, या बैठकीनंतरही आठ दिवस उलटून गेले, तरी परिस्थितीत अपेक्षित सुधारणा झाली नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीनंतरही प्रश्न सुटत नसेल, तर दाद मागायची कोणाकडे, असा संतप्त सवाल शेतकरी उपस्थित करीत आहेत.

उपकेंद्रावर धडक; शेतकऱ्याचा टोकाचा प्रयत्न

गुरुवारी सायंकाळी सुमारे पाच वाजण्याच्या सुमारास अंभोळ आणि पैठण येथील ३० ते ४० शेतकरी एकत्र येत कोतूळ येथील वीज वितरण उपकेंद्रावर धडकले. यावेळी वीजपुरवठ्याच्या समस्येवरून शेतकऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. आंदोलनादरम्यान निलेश तळेकर या शेतकऱ्याने उपकेंद्र परिसरातील झाडाला दोर बांधून फाशी घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, उपस्थित शेतकऱ्यांनी प्रसंगावधान राखत तातडीने हस्तक्षेप केल्याने अनर्थ टळला.

शेतीसाठी आवश्यक असलेला वीजपुरवठाच सुरळीत मिळत नसेल, तर पिके जगवायची कशी आणि शेतीचा खर्च भागवायचा कसा, असा सवाल या घटनेच्या निमित्ताने उपस्थित होत आहे. शेतकऱ्यांच्या या आक्रमक भूमिकेमुळे महावितरणच्या अधिकारी वर्गात खळबळ उडाली असून, अधिकाऱ्यांना जाब विचारण्यासाठी आलेल्या शेतकऱ्यांच्या रोषाला सामोरे जावे लागले.

शेतकऱ्यांच्या शेतीचा संपूर्ण हंगाम पाण्याच्या उपलब्धतेवर अवलंबून असताना वीजपुरवठ्यातील अनियमितता त्यांच्या अडचणींमध्ये भर घालत आहे. बैठका, आश्वासने आणि आदेश होऊनही प्रत्यक्षात वीजपुरवठा सुधारत नसेल, तर त्याचा फटका थेट शेतकऱ्यांच्या उत्पादनाला आणि उत्पन्नाला बसतो.

**शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या- वारंवार खंडित होणारा आणि कमी-जास्त होणारा वीजपुरवठा तातडीने सुरळीत करावा., कृषी पंपांसाठी नियमानुसार दररोज आठ तास अखंडित वीजपुरवठा द्यावा. वीजपुरवठ्यातील अनियमिततेमुळे ज्या शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले आहे, त्याची चौकशी करावी. पिकांच्या नुकसानीस जबाबदार असल्याचे निष्पन्न होणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. आता तरी महावितरण जागे होणार का?**

# सूत्राच्या जिवाची हमी दिली तर शिंदे-फडणवीसांना क्लिप देतो- जरांगे



मुंबई (वृत्तसंस्था)

गोरगरीब मराठा समाजाच्या आणि माझ्या राजकीय अस्तित्वाच्या विरोधात पडद्यामागे नेमके किती भयंकर कटकारस्थान शिजत होते, हे मी ऑडिओ क्लिपच्या माध्यमातून उघडकीस आणले आहे. स्वतःचा हा मोठा अपराध झाकण्यासाठी आणि सत्य पचवण्याची हिंमत नसल्याने आता भारतीय जनता पक्ष आणि एकनाथ शिंदेंचा पक्ष हे दोन्ही पक्ष एकत्र येऊन माझ्या मागे लागतील, अशी दाट शक्यता आहे. मात्र, या सर्व राजकीय ताकदीला मी एकटाच पुरून उरेन! विशेष म्हणजे, माझी पत्रकार परिषद होण्याच्या २ तास आधीच केवळ श्रीकांत शिंदेंच्या ५०० कोटींच्या उल्लेखाची क्लिप टीव्ही चॅनेलवर रामदास कदमांनी वाजवली; मग एकनाथ शिंदेंची खरी बदनामी मी केली की रामदास कदमांनी? असा खडा सवाल मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी उपस्थित केला आहे.

एका वृत्तवाहिनीशी संवाद साधताना मनोज जरांगे पाटील यांनी ५०० कोटींच्या ऑडिओ क्लिपचा तपास, सत्ताधाऱ्यांची पडद्यामागची रणनीती आणि शिवसेना नेते रामदास कदम यांच्या भूमिकेवर अत्यंत सडेतोड भाष्य केले. ऑडिओ क्लिपच्या चौकशीबाबत आणि भविष्यातील राजकीय धोक्याबाबत बोलताना जरांगे पाटील म्हणाले, मला ज्या सूत्राने ही क्लिप दिली आहे, त्याचे नाव उघड करणार नाही आणि त्याच्या जिवाला कोणताही धोका निर्माण होऊ देणार नाही, अशी जबाबदारी जर स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे किंवा उदय सामंत घेणार असतील, तर आम्ही ती क्लिप त्यांच्याकडे सोपवून पूर्ण सहकार्य करायला तयार आहोत. या चौकशीतून सत्य बाहेर येईल अशी आशा वाटते; पण दुसरीकडे अशीही शंका आहे की हे संभाषण १०० टक्के सत्य असल्याने ते दडपण्यासाठी आता हे दोन्ही पक्ष (भाजप आणि शिवसेना शिंदे गट) एकत्र येतील. समोर गोड बोलायचे आणि पडद्यामागे मराठ्यांच्या विरोधात भयंकर कट रचायचे, हे उघडे पडल्यामुळे त्यांना आता पाय ठेवायला जागा उरलेली नाही. सत्य स्वीकारायला वाघाचे काळीज लागते. त्यामुळे आता हे सत्य खोटे ठरवण्यासाठी दोन्ही पक्ष मिळून माझ्या मागे लागतील. पण मी गेल्या ३ वर्षांपासून हे सहन करत असून, आता या सर्वांचा फडशा पाडल्याशिवाय शांत बसणार नाही.

# मुंढवा जमीन प्रकरणात सुनेत्रा पवार यांच्या स्वीय सहायकांना नोटीस

मुंबई (वृत्तसंस्था)

कोरेगाव पार्क (मुंढवा) जमीन गैरव्यवहार प्रकरणात उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या दोन स्वीय सहायकांना पुणे पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेकडून नोटीस बजाविण्यात आली आहे. 'गैरव्यवहार प्रकरणातील आरोपी शीतल तेजवानी यांच्या वकिलांनी दिलेल्या अर्जानंतर तपासाच्या अनुषंगाने ही नोटीस बजाविण्यात आली आहे,' अशी माहिती पुणे पोलीस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. कोरेगाव पार्क जमीन व्यवहार प्रकरणात आणखी आठ ते दहा जणांचे जबाब नोंदविण्यात येणार आहे. 'जमीन गैरव्यवहार प्रकरणाची माहिती 'अमेडिया एंटरप्रायजेस एलएलपी' कंपनीतील संबंधित व्यक्तींना होती,' असा दावा या प्रकरणातील आरोपी शीतल तेजवानी यांच्या वकिलांनी पोलिसांकडे दिलेल्या तक्रार अर्जाद्वारे केला आहे.

'संबंधित तक्रार अर्जाच्या अनुषंगाने सुनेत्रा पवार यांच्या दोन स्वीय सहायकांना नोटीस बजाविण्यात आली आहे. त्याअनुषंगाने आठ ते दहा जणांची चौकशी केली जाणार आहे तसेच त्यांचे जबाब नोंदविण्यात येणार आहेत. त्यानुसार तपासाची दिशा निश्चित केली जाणार आहे', असे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी स्पष्ट केले. कोरेगाव पार्क जमीन गैरव्यवहार प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडून केला जात आहे. या प्रकरणात आतापर्यंत दोन ते तीन जणांचे जबाब नोंदविण्यात आले आहेत.

पान १ वरून-

# जरांगे-शिंदेंचे...

आवश्यक असल्याची भूमिकाही त्यांनी मांडली.

दरम्यान, पृथ्वीराज चव्हाण यांनी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या भाजप प्रवेशाबाबत सुरू असलेल्या चर्चांवरही प्रतिक्रिया दिली. भाजपकडून विरोधी पक्षांतील नेत्यांना पक्षात आणण्यासाठी विविध प्रकारच्या ऑफर्स दिल्या जातात, हा त्यांच्या राजकीय कार्यपद्धतीचा भाग असल्याचे चव्हाण म्हणाले. सुशीलकुमार शिंदे यांनाही भाजपने पक्षात आणण्याचा प्रयत्न केला असावा; मात्र निष्ठावंत काँग्रेसजन असलेल्या शिंदे यांनी ही ऑफर नाकारल्याचा दावा त्यांनी केला.

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाच्या (गोकुळ) निकालाचा संदर्भ देत चव्हाण यांनी भाजप आणि राज्यातील सत्ताधाऱ्यांवरही टीका केली. या निकालावरून काँग्रेस नेते सतेज पाटील यांचे त्यांनी अभिनंदन केले. '२५-०' असा एकतर्फी विजय मिळेल आणि कोल्हापुरात जाऊन गुलाल उधळू, अशा अतिआत्मविश्वासात मुख्यमंत्री होते; मात्र कोल्हापूरच्या जनतेने सत्ताधाऱ्यांना स्पष्ट संदेश दिला, असा दावा चव्हाण यांनी केला.

गोकुळच्या निकालातून सत्ताधाऱ्यांविरोधातील जनमताचे संकेत मिळत असल्याचे सांगत आगामी काळात राज्यात आणि देशात सत्तापरिवर्तन होऊ शकते, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. एकीकडे कथित ५०० कोटींच्या ऑडिओ क्लिपवरून जरांगे पाटील आणि शिंदे यांच्या राजकीय भवितव्याबाबत चर्चा रंगली आहे, तर दुसरीकडे काँग्रेस नेत्यांकडून भाजपच्या राजकीय रणनीतीवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. या संपूर्ण प्रकरणात आरोपांची सत्यता, ऑडिओ क्लिपची विश्वासार्हता आणि कथित राजकीय हस्तक्षेप याबाबत अधिकृत तपासातून काय निष्पन्न होते, याकडे आता राज्याचे लक्ष लागले आहे.

# दुष्काळाच्या संकटाकडे...

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर दिवाळीत शेतकऱ्यांना जाहीर केलेली पाच हजार रुपयांची मदत अपुरी असली, तरी राज्याच्या आर्थिक परिस्थितीत सरकारने शक्य ती मदत देण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र, शेतमजुरांनाही आर्थिक मदत मिळाली पाहिजे. त्याचबरोबर रोजगार हमी योजनेची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू केल्यास शेतमजुरांना रोजगाराचा आधार मिळेल, असे तांबे यांनी सांगितले.

दुष्काळाचे संकट अधिक गंभीर होण्यापूर्वी प्रशासनाने ठोस उपाययोजना सुरू कराव्यात, पाण्याचा काटकसरीने वापर व्हावा यासाठी जनजागृती आणि नियोजन करण्यास प्राधान्य द्यावे. शेतकरी, शेतमजूर व नागरिकांना दिलासा देण्यासाठी सर्व लोकप्रतिनिधी व शासकीय विभागांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन आमदार सत्यजीत तांबे यांनी केले.

# दिल्लीत पुन्हा आंदोलनाचे बिगूल वाजण्याची शक्यता



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

दिल्लीत पुन्हा आंदोलनाचं बिगूल वाजण्याची शक्यता आहे. यासाठी प्रशासन आधीच अलर्ट मोडवर आहे. याबाबत आता मोठी बातमी समोर आली आहे. दिल्लीत संभाव्य आंदोलनांची शक्यता असल्याने केंद्रीय गृह मंत्रालयाने मोठा निर्णय घेतला आहे. या निर्णयानंतर सीजेपीचेही टेन्शन वाढले आहे. यामुळे आता चर्चांना उधाण आले आहे.केंद्रीय गृह मंत्रालयाने राजधानीतील केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या २७३ कंपन्यांची तैनाती ३१ ऑक्टोबरपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. या महिन्याच्या सुरुवातीला कॉकरोच जनता पक्षाने दिल्लीत आंदोलन छेडले होते. या पार्श्वभूमीवर या कंपन्यांना दिल्लीत आणण्यात आले होते. मात्र आता त्यांच्या तैनातीची मुदत आता वाढवण्यात आली आहे. गृह मंत्रालयाने दिल्ली पोलीस आणि संबंधित केंद्रीय सशस्त्र पोलीस दलांना २२ ऑक्टोबर रोजी या तैनातीमध्ये समन्वय साधण्याचे निर्देश दिले आहेत.दिल्लीतील आंदोलनांमुळे दिल्ली पोलिसांनी केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाची तैनाती २० ऑक्टोबरपर्यंत वाढवण्याची विनंती केली होती. याला प्रतिसाद म्हणून दिल्ली पोलिसांनी गृह मंत्रालयाला एक पत्र पाठवले. या पत्राद्वारे केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या २७३ कंपन्यांची तैनाती मुदतीनंतरही सुरू ठेवण्याची परवानगी मागण्यात आली होती. १० ऑक्टोबर रोजी सीजेपीने केलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर दिल्लीत उ-झऋ ची मोठ्या प्रमाणावर तैनाती करण्यात आली होती.दिल्ली पोलिसांच्या विनंतीनंतर गृह मंत्रालयाने केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या एकूण ३०१ कंपन्यांच्या तैनातीला मंजुरी दिली आहे. ६ ऑक्टोबर रोजी २२१ कंपन्या आणि ८ ऑक्टोबर रोजी ८० कंपन्या तैनात करण्याची विनंती करण्यात आली होती. सीजेपी आणि इतर संघटनांकडून होणाऱ्या संभाव्य विरोधाच्या पार्श्वभूमीवर गृह मंत्रालयाने दिल्ली पोलिसांकडून केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या अतिरिक्त तैनातीला मंजुरी दिली आहे.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# राज्यस्तरीय 'आरोग्यदूत' पुरस्काराने डॉ. प्रकाश वाकचौरे यांचा सन्मान

## ग्रामीण भागातील आरोग्यसेवा, सामाजिक व शैक्षणिक कार्याची दखल



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- अकोले येथील कारखाना रोड, राधानगरी कॉलनी येथे असलेले अकोले हॉस्पिटलचे संस्थापक डॉ. प्रकाश पंढरीनाथ वाकचौरे यांना स्वराज्य सरपंच सेवा संघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने राज्यस्तरीय 'आरोग्यदूत २०२६' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. गुरुवार, दि. २२ ऑक्टोबर २०२६ रोजी अहिल्यानगर येथील माऊली संकुल सभागृह, सावेडी रोड येथे झालेल्या पुरस्कार सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या वेळी श्री. प्रवीण महामुनी (साईलीला संगीतमय महानाट्य), अमोल शेवाळे, यादवराव पावसे (समाजसेवक) आणि संघटित चळवळीचे नेते बाबासाहेब पावसे यांच्यासह वैद्यकीय, सामाजिक, राजकीय व विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

अकोले तालुक्यांतील ग्रामीण भागातील सर्वसामान्य कुटुंबांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने डॉ. प्रकाश वाकचौरे यांनी अकोले हॉस्पिटल आणि अकोले मेडिकल फाउंडेशनच्या माध्यमातून विविध आरोग्यविषयक व सामाजिक उपक्रम राबविले आहेत. त्यांच्या पुढाकारातून ग्रामीण भागात मोफत सर्वरोग निदान व उपचार संदर्भात मार्गदर्शन शिबिरे, रक्त तपासणी शिबिरे, रक्तदान उपक्रम, हृदयरोग तपासणी, मधुमेह व रक्तदाब तपासणी तसेच महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्यविषयक उपक्रम आयोजित केले जातात. ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठीही ते सातत्याने प्रयत्नशील असतात. आरोग्यासोबत शिक्षण आणि सामाजिक बांधिलकी व वैद्यकीय सेवेसोबतच शैक्षणिक क्षेत्रातही डॉ. प्रकाश वाकचौरे यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे, या हेतूने शैक्षणिक साहित्य व पुस्तके भेट देणे, तसेच विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शनाचे उपक्रम ही राबविण्यात येतात. विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकासासाठी डॉ. प्रकाश पंढरीनाथ वाकचौरे आणि त्यांच्या पत्नी रुपाली प्रकाश वाकचौरे सातत्याने प्रयत्न करतात. या सर्व उपक्रमांना अकोले हॉस्पिटलच्या संपूर्ण कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभते.

आर्थिक अडचणींमुळे कोणत्याही रुग्णाला उपचारांपासून वंचित राहावे लागू नये, या उद्देशाने डॉ. प्रकाश वाकचौरे आणि अकोले मेडिकल फाउंडेशनच्या वतीने आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना, महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना, बांधकाम कामगार योजना आणि मुख्यमंत्री सहायता निधी यांसारख्या योजनांबाबत नागरिकांना माहिती व मार्गदर्शन केले जाते.

गरजू रुग्णांना योग्य वेळी योग्य उपचार मिळावेत, शासकीय योजनांचा लाभ मिळावा आणि समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्यसेवा पोहोचावी, हीच त्यांच्या कार्यामागील प्रमुख प्रेरणा आहे. वैद्यकीय सेवा, आरोग्यविषयक जनजागृती, रक्तदान, शैक्षणिक उपक्रम आणि सामाजिक बांधिलकी जपत केलेल्या कार्याची दखल घेऊन डॉ. प्रकाश पंढरीनाथ वाकचौरे यांना राज्यस्तरीय 'आरोग्यदूत २०२६' पुरस्काराने गौरविण्यात आले. त्यांच्या या सन्मानामुळे अकोले तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, वैद्यकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि विविध क्षेत्रांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# 500 कोटीचे सुत्रधार राऊतच - नवनाथ बन

मुंबई (वृत्तसंस्था)

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी उघड केलेल्या ५०० कोटींच्या कथित ऑडिओ क्लिपवरून राज्यातील राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. विरोधकांनी यावरून सत्ताधाऱ्यांना धारेवर धरले असताना, आता भाजपचे प्रवक्ते नवनाथ बन यांनी एक अत्यंत खळबळजनक आणि गंभीर आरोप केला आहे. ही ५०० कोटींची ऑडिओ क्लिप संजय राऊत यांच्या वाशी येथील वॉर रूममध्ये 'एआय' च्या मदतीने तयार करण्यात आली असून, याचे मुख्य सूत्रधार संजय राऊतच आहेत, असा मोठा गौप्यस्फोट नवनाथ बन यांनी पत्रकार परिषदेत केला आहे. या प्रकरणी राऊत यांच्यावर तात्काळ गुन्हा दाखल करण्याची मागणीही त्यांनी केली.

ऑडिओ क्लिपच्या निर्मितीवर गंभीर आरोप करताना बन म्हणाले, संजय राऊत यांनी त्यांच्या टीमला कामाला लावून गेल्या दोन महिन्यांपासून ही ऑडिओ क्लिप तयार केली. वाशी येथील वॉर रूममध्ये 'एआय'चा वापर करून आणि युट्युबवरील नेत्यांचे ऑडिओ सॅम्पल्स घेऊन ही क्लिप बनवली गेली. या पूर्ण ऑडिओ क्लिपची स्क्रिप्ट सामनाच्या कार्यालयात बसून स्वतः संजय राऊत यांनी लिहिली आहे. कोणाच्या तोंडी कोणते डायलॉग टाकायचे, हे राऊतांनीच ठरवले.५०० कोटींच्या आकड्याबाबत बोलताना त्यांनी एक धक्कादायक दावा केला. संजय राऊतांची सुरुवातीला १०० कोटींचा आरोप टाकण्याची इच्छा होती.

# मच्छीमार बांधवांच्या मदतीसाठी सरकार पुढे - मंत्री नितेश राणे

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - संपूर्ण महाराष्ट्र दुष्काळामध्ये होरपळून निघत आहे. महाराष्ट्र दुष्काळाच्या सावटाखाली असताना शेतकऱ्यांसह मच्छीमार बांधवांना सरकारकडून मदत केली जात आहे. आता अशातच अतिवृष्टी आणि दुष्काळामुळे आर्थिक विवंचनेत सापडलेल्या मच्छीमार बांधवांना दिलासा देण्यासाठी तलावातील गाळ काढण्याची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी. शिवाय, आवश्यक मत्स्यबीजाची मागणी निश्चित करून त्यानुसार नियोजन करावे, असे निर्देश मत्स्यव्यवसाय आणि बंदरे मंत्री नितेश राणे यांनी अधिकाऱ्यांना दिले आहेत.

राज्यामध्ये असलेल्या दुष्काळजन्य परिस्थितीमध्ये राज्य सरकार मच्छीमार बांधवांच्या पाठीशी ठामपणे उभे असून, त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येणार असल्याची माहिती मंत्री नितेश राणे यांनी दिली. मत्स्यव्यवसाय आणि बंदरे मंत्रालयाकडून मच्छिमार बांधवांना मदतीचा हात पुढे आल्यानंतर अहिल्यानगर जिल्ह्यातील चिंचोडी पाटील गावातील अनेक मच्छिमार बांधवांनी सुटकेचा नि:श्वास सोडला. दरम्यान, आज मंत्री नितेश राणे अहिल्यानगर जिल्ह्यातील चिंचोडी पाटील गावामध्ये पाहणी केली. यावेळी मंत्री नितेश राणे यांच्यासह अधिकारी, जिल्हाधिकाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनीही त्यांच्यासोबत तलावाची पाहणी केली.

# टिळक भवनातील काँग्रेस बैठकीत संविधान रक्षणाचा निर्धार

मुंबई (वृत्तसंस्था)

मुंबई दादर येथील टिळक भवन, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी येथे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अनुसूचित जाती विभागाची महत्त्वपूर्ण आढावा बैठक मोठ्या उत्साहात संपन्न झाली.

या बैठकीस अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस अनुसूचित जाती विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. राजेंद्र पाल गौतम जी, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मा. हर्षवर्धनजी सपकाळ, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे राष्ट्रीय कॉर्डिनेटर व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष डॉ. सिद्धार्थजी हत्तीअंबिरे , तसेच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अनुसूचित जाती विभागाचे प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीतील ख्यातनाम गायक व सर्वसामान्य कार्यकर्त्यांचे हक्काचे नेतृत्व डॉ. अनिरुद्धजी वनकर यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक पार पडली. बैठकीचे नेटके आयोजन प्रदेशाध्यक्ष डॉ. अनिरुद्ध वनकर यांनी केले होते.

यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र पाल गौतम जी यांनी कार्यकर्त्यांना संबोधित करताना सांगितले, आज देशात संविधान आणि लोकशाही धोक्यात आहे. बाबासाहेबांनी दिलेले संविधान वाचवायचे असेल तर आदरणीय राहुल गांधीजींचे हात बळकट करावे लागतील. काँग्रेस पक्ष हाच खऱ्या अर्थाने दलित, शोषित, वंचितांचा आवाज आहे. आज काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष स्वतः



खा. मल्लिकार्जुन खरगे साहेब हे अनुसूचित जाती समाजातून येतात, यावरूनच कळते की काँग्रेसमध्ये जातीपातीचे राजकारण होत नाही तर कर्तृत्वाला संधी दिली जाते. अनुसूचित जाती विभागाने आता गावागावात जाऊन संविधान बचावाचा लढा अधिक तीव्र केला पाहिजे.

प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आपल्या अभ्यासपूर्ण भाषणात सांगितले की, महाराष्ट्र ही पुरोगामी विचारांची भूमी आहे. शाहू, फुले, आंबेडकरांच्या विचारावर हा महाराष्ट्र उभा आहे. काँग्रेस पक्षाने नेहमीच सामाजिक न्यायाची भूमिका घेतली आहे. येणाऱ्या काळात प्रत्येक जिल्ह्यात अनुसूचित जाती विभाग अधिक मजबूत करून बुथस्तरापर्यंत संघटन पोहोचवले पाहिजे.

डॉ. सिद्धार्थ हत्तीअंबिरे म्हणाले, काँग्रेसचा इतिहास हा त्याग आणि बलिदानाचा इतिहास आहे. आज आपल्याला विचारांची लढाई लढायची आहे. सोशल मीडियापासून ते मैदानापर्यंत आपण संविधानाचे रक्षक म्हणून उभे राहिले पाहिजे.

प्रदेशाध्यक्ष डॉ.अनिरुद्ध वनकर यांनी आपल्या प्रास्ताविक मनोगतात सांगितले की, मी एक कलाकार म्हणून नाही तर एक कार्यकर्ता म्हणून काम करतोय. मला पदापेक्षा माणसं मोठी वाटतात. सामान्यातील असामान्य कार्यकर्त्याला ताकद देणे हेच माझे ध्येय आहे. आपल्या विभागाच्या माध्यमातून आपण लवकरच संपूर्ण महाराष्ट्राचा दुसऱ्यांदा दौरा करणार आहोत.

यावेळी महाराष्ट्रातून सर्व जिल्ह्यांचे जिल्हाध्यक्ष, शहराध्यक्ष, जिल्हा काँग्रेस व प्रदेश काँग्रेसचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी अहिल्यानगर जिल्हा काँग्रेस कमिटीचा आढावा जिल्हाध्यक्ष बंटी यादव यांनी सादर केला. अहिल्यानगर जिल्ह्यातून मा. जिल्हा कार्याध्यक्षअरुण गावित्रे, जिल्हा उपाध्यक्ष शशिकांत थोरात, ज्येष्ठ काँग्रेसी मारुतीराव सोनवणे, जिल्हा सरचिटणीस विनोद गायकवाड,आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नाशिकच्या शिरपेचात मानाचा तुरा

## साक्षी चांडक CA इंटरमध्ये देशात प्रथम!

इगतपुरी येथील साक्षी प्रकाश चांडक हिने सनदी लेखापाल (सीए) इंटरमिजिएट परीक्षेत देशात प्रथम क्रमांक मिळविला आहे. सप्टेंबर २०२६ मध्ये झालेल्या परीक्षेतील तिच्या यशामुळे नाशिक जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्रात अभिमानाची भर पडली आहे.



साक्षीने दहावीनंतरच सीए होण्याचे ध्येय निश्चित केले होते. प्राथमिक ते दहावीपर्यंतचे शिक्षण तिने सीबीएसई बोर्डातून पूर्ण केले. दहावीच्या परीक्षेत तिने अव्वल स्थान मिळविले. त्यानंतर नाशिक येथील बी.वाय.के. महाविद्यालयात अकरावी आणि बारावीचे शिक्षण घेतले. बारावीच्या परीक्षेत तिने महाविद्यालयातून चौथा क्रमांक मिळविला. २०२५ मध्ये झालेल्या सीए फाउंडेशन परीक्षेत साक्षीने देशात चौथा क्रमांक मिळविला होता. त्यानंतर इंटरमिजिएट परीक्षेत देशात प्रथम क्रमांक मिळवत तिने आपल्या यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला. साक्षीने परीक्षेच्या तयारीसाठी कठोर परिश्रम घेतले. 'माइंड स्पार्क' येथे शिकवणी सुरू असताना दररोज सुमारे १० तास व्याख्याने होत असत. त्यानंतर पाच ते सहा तास ती स्वयंअध्ययन करत होती. परीक्षेपूर्वीच्या शेवटच्या चार महिन्यांत तिने दररोज १२ ते १४ तास अभ्यास केला. अभ्यासातील एकाग्रता टिकवण्यासाठी तिने सोशल मीडियापासून दूर राहण्याचा निर्णय घेतला. नियमित उजळणी, सराव आणि चुकांचे विश्लेषण यावर तिने विशेष भर दिला. साक्षीचे वडील प्रकाश चांडक यांचा इगतपुरी येथे कापड विक्रीचा व्यवसाय आहे, तर आई पूनम चांडक गृहिणी आहेत. तिच्या यशात कुटुंबीयांचे प्रोत्साहन आणि सहकार्य महत्त्वाचे ठरले. या यशाबद्दल बोलताना साक्षीने सांगितले की, सीए फाउंडेशन परीक्षेत देशात चौथा क्रमांक मिळवल्यानंतर इंटरमिजिएट परीक्षेत देशात प्रथम येण्याचे ध्येय होते. आता सीएच्या अंतिम परीक्षेतही चांगली कामगिरी करण्याचा तिचा मानस आहे. 'कर्म करत राहा, फळ आपोआप मिळेल,' या विचारावर आपला विश्वास असल्याचेही तिने सांगितले.

साक्षीच्या मते, परीक्षेच्या तयारीत वेळेचे योग्य नियोजन आणि अभ्यासातील सातत्य यांना विशेष महत्त्व आहे. शिकवणीमध्ये शिकविलेल्या विषयांची नियमित उजळणी करणे, सराव प्रश्न सोडविणे आणि झालेल्या चुका सुधारण्यावर भर देणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी अभ्यासाचे नियोजन सुरुवातीपासून केल्यास परीक्षेच्या काळातील ताण कमी होण्यास मदत होते, असा सल्लाही तिने दिला. सीए परीक्षेतील यशामुळे साक्षीने देशभरातील विद्यार्थ्यांसमोर आपल्या गुणवत्तेची छाप उमटविली आहे. तिच्या या कामगिरीमुळे इगतपुरीसह नाशिक जिल्ह्यात आनंदाचे वातावरण असून, तिचे कुटुंबीय, मार्गदर्शक आणि मित्रपरिवाराकडून अभिनंदन करण्यात येत आहे. आगामी सीए अंतिम परीक्षेतही उल्लेखनीय यश मिळविण्याच्या उद्देशाने साक्षीने पुढील तयारीवर लक्ष केंद्रित केले.

# चांदण्यांचा उत्सव अन् परंपरेचा गोडवा!




भारतीय संस्कृतीत प्रत्येक सणाला विशेष महत्त्व आहे. निसर्ग, परंपरा, श्रद्धा आणि आनंद यांचा सुंदर संगम असलेला कोजागिरी पौर्णिमेचा सण त्यापैकीच एक आहे. आश्विन महिन्यातील पौर्णिमेला साजरा होणारा हा उत्सव शरद ऋतूच्या आगमनाची चाहूल देतो. निरभ्र आकाश, चंद्राचा शीतल प्रकाश, चांदण्यांनी सजलेली रात्र आणि मसाला दुधाचा सुगंध अशा प्रसन्न वातावरणात कोजागिरी पौर्णिमा मोठ्या उत्साहाने साजरी केली जाते.

कोजागिरी पौर्णिमेचे धार्मिक महत्त्व

कोजागिरी पौर्णिमेला शरद पौर्णिमा असेही म्हटले जाते. 'को जागर्ति?' या संस्कृत शब्दांचा अर्थ 'कोण जागे आहे?' असा होतो. पौराणिक मान्यतेनुसार, या रात्री देवी लक्ष्मी पृथ्वीवर भ्रमण करते आणि जागृत राहून तिची आराधना करणाऱ्या भक्तांवर कृपा करते, अशी श्रद्धा आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी लक्ष्मीपूजन केले जाते. काही भाविक रात्रभर जागरण करून भजन, कीर्तन आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करतात.

या दिवशी चंद्र आपल्या पूर्ण तेजाने प्रकाशमान असतो. चंद्रप्रकाशाला भारतीय परंपरेत शीतलता, शांतता आणि सकारात्मकतेचे प्रतीक मानले जाते. त्यामुळे कोजागिरीची रात्र आध्यात्मिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातूनही महत्त्वाची मानली जाते.

मसाला दुधाची गोड परंपरा

कोजागिरी पौर्णिमा म्हटली की सर्वप्रथम आठवते ते म्हणजे मसाला दूध! या रात्री दूध आटवून त्यात साखर, वेलची, केशर, बदाम, पिस्ता आणि इतर सुकामेवा घालून स्वादिष्ट दूध तयार केले जाते. अनेक कुटुंबांमध्ये हे दूध चंद्रप्रकाशात ठेवून नंतर प्राशन करण्याची परंपरा आहे.

चंद्रप्रकाशात ठेवलेल्या दुधाचे सेवन केल्याने आरोग्याला विशेष लाभ होतो, अशी लोकमान्यता आहे. मात्र, चंद्रप्रकाशामुळे दुधाचे औषधी गुण वाढतात, याला ठोस वैज्ञानिक पुरावा उपलब्ध नाही. दुधातील पोषक घटकांचा लाभ घेण्यासाठी स्वच्छ आणि सुरक्षित पद्धतीने तयार केलेले दूध पिणे महत्त्वाचे आहे.

सामाजिक एकोपा आणि सांस्कृतिक उत्सव

कोजागिरी पौर्णिमा हा केवळ धार्मिक सण नसून सामाजिक एकोपा वाढवणारा उत्सवही आहे. शहरांमध्ये, गावांमध्ये, सोसायट्यांमध्ये तसेच विविध संस्था आणि मंडळांच्या वतीने कोजागिरीचे कार्यक्रम आयोजित केले जातात. संगीत, गायन, मनोरंजनाचे कार्यक्रम आणि सामूहिक मसाला दूधपान यामुळे या उत्सवाला विशेष रंगत येते. आजच्या धावपळीच्या जीवनात कुटुंबातील सदस्यांना एकत्र वेळ घालवण्याची संधी कमी मिळते. अशा वेळी कोजागिरी पौर्णिमा कुटुंबीय, मित्रपरिवार आणि शेजाऱ्यांना एकत्र आणण्याचे काम करते. गप्पा, हास्यविनोद आणि चांदण्यांच्या साक्षीने अनुभवलेले आनंदाचे क्षण नात्यांमधील जिव्हाळा अधिक दृढ करतात.

निसर्गाशी नाते जोडणारी पौर्णिमा

कोजागिरी पौर्णिमा आपल्याला निसर्गाच्या सौंदर्याचा अनुभव घेण्याची संधी देते. शरद ऋतूतील स्वच्छ आकाश आणि पूर्ण चंद्राचे मनमोहक रूप मनाला प्रसन्नता देते. या निमित्ताने काही क्षण मोबाईल आणि दैनंदिन धावपळीपासून दूर राहून निसर्गाचा आनंद घेता येतो.

कोजागिरीचा खरा आनंद केवळ मसाला दूध पिण्यात किंवा जागरण करण्यात नसून श्रद्धा, आपुलकी आणि आनंद यांचा अनुभव घेण्यात आहे. परंपरेचा वारसा जपत, कुटुंबीय आणि मित्रांसोबत प्रेमाचे क्षण साजरे करणे, हाच या उत्सवाचा खरा संदेश आहे.

चंद्राच्या शीतल प्रकाशात मनातील कटुता दूर करून प्रेम, आनंद आणि सकारात्मकतेचा प्रकाश प्रत्येकाच्या आयुष्यात पसरावा, हीच कोजागिरी पौर्णिमेची खरी शिकवण!

# दिवाळीत फटाके फोडताना सावधान! उच्च न्यायालयाचे कडक निर्बंध

## नियम मोडल्यास कारवाईचा बडगा!



मुंबई (वृत्तसंस्था)

दिवाळीचा सण उत्साहात साजरा करताना ध्वनी आणि वायुप्रदूषणाला आळा घालण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाने फटाक्यांबाबत घालून दिलेल्या निर्बंधांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि मुंबई महापालिकेने नागरिकांना नियमांचे उल्लंघन न करण्याचे आवाहन केले असून, नियम मोडणाऱ्यांवर कायदेशीर कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे. त्यामुळे यंदा दिवाळीत फटाके फोडताना नागरिकांना विशेष खबरदारी घ्यावी लागणार आहे.

उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार सार्वजनिक रस्ते, गल्लीबोळ आणि पदपथांवर फटाके फोडण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच रुग्णालये, शैक्षणिक संस्था, सरकारी कार्यालये आणि न्यायालयांच्या १०० मीटर परिसरात फटाके फोडता येणार नाहीत. ध्वनीप्रदूषण रोखण्यासाठी रात्री १० ते सकाळी ६ या वेळेत आवाज करणाऱ्या फटाक्यांवरही निर्बंध लागू आहेत.

सण, उत्सव आणि मिरवणुकांमध्ये लेझर, तीव्र प्रकाशाचे दिवे तसेच बीम लाइट्सच्या वापराबाबतही न्यायालयाने निर्बंध घातले आहेत. सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये ध्वनीची पातळी मोजण्यासाठी आवश्यक उपकरणे ठेवण्यावर भर देण्यात आला असून, खासगी कार्यक्रमांनाही निर्धारित ध्वनीमर्यादांचे पालन करणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

दिवाळीत फटाके फोडायचेच असल्यास निर्धारित वेळेत कमी प्रदूषण करणाऱ्या प्रमाणित ग्रीन फटाक्यांचा वापर करण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. मात्र, ग्रीन फटाक्यांच्या सुरक्षिततेबाबतही प्रश्न उपस्थित झाले आहेत. 'आवाज फाउंडेशन'ने ग्रीन फटाक्यांमध्येही विषारी जड धातू आढळत असल्याचा दावा केला असून, सर्व प्रकारच्या फटाक्यांवर बंदी घालण्याची मागणी केली आहे. ध्वनीप्रदूषण, पर्यावरण संरक्षण, फौजदारी कायदे आणि स्फोटक पदार्थांशी संबंधित कायद्यांनुसार नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई होऊ शकते. नागरिकांना नियमभंगाच्या घटनांची तक्रार नोंदवण्यासाठी चझउइच्या 'महा पर्यावरण' पचाही वापर करता येणार आहे.

न्यायालयाने यापूर्वी दिलेल्या निर्देशांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याबद्दल उच्च न्यायालयाने प्रशासनावर नाराजी व्यक्त केल्याची माहिती आहे. काही पोलीस अधिकाऱ्यांनी निर्बंधांची माहिती नसल्याचे सांगितल्याची नोंदही न्यायालयाने घेतली आहे. या पार्श्वभूमीवर मुंबई महापालिका, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि पोलीस प्रमुखांना २६ ऑक्टोबर रोजी न्यायालयात हजर राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

एकूणच, दिवाळीचा आनंद साजरा करताना इतरांच्या आरोग्याला आणि पर्यावरणाला धोका निर्माण होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे. फटाक्यांचा आवाज आणि धूर टाळून नियमांचे पालन करणे, हीच सुरक्षित आणि प्रदूषणमुक्त दिवाळीची खरी ओळख ठरणार आहे.

## सणासुदीत एफडीएची धडक कारवाई

# नाशिकमध्ये मसाला उत्पादकावर छापा



युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - सण-उत्सव विशेष मोहीम २०२६ अंतर्गत अन्न व औषध प्रशासनाच्या नाशिक विभागाने मोठी कारवाई केली आहे. द्वारका परिसरातील 'मे. सोमेश्वर घरगुती मसाले' या आस्थापनेवर छापा टाकून प्रशासनाने तब्बल २ हजार २३० किलो मसाल्यांचा साठा जप्त केला आहे. जप्त करण्यात आलेल्या या मसाल्याची बाजारभावानुसार एकूण किंमत ११ लाख ८६ हजार २०० रुपये इतकी आहे.अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंढे सहआयुक्त मंगेश माने आणि सहायक आयुक्त (अन्न) व्ही. पी. धवड यांच्या मार्गदर्शनाखाली २२ ऑक्टोबर रोजी ही धडक कारवाई करण्यात आली. द्वारका येथील तिगरानिया औद्योगिक क्षेत्रातील प्लॉट क्रमांक ५६, सर्व्हे क्रमांक ४०२/४०२/१ येथे असलेल्या 'मे. सोमेश्वर घरगुती मसाले' या कारखान्याची तपासणी करण्यात आली.

तपासणीदरम्यान विविध प्रकारच्या मसाल्यांच्या पॅकिंगवर लेबलिंगविषयक नियमांचे उल्लंघन झाल्याचे उघड झाले. तसेच, अन्नपदार्थांचा दर्जा निर्धारित गुणवत्ता निकषांनुसार नसल्याचा संशय आल्याने प्रशासनाने तात्काळ संपूर्ण साठा ताब्यात घेतला. प्रशासनाने जप्त केलेल्या ११,८६,२०० रुपयांच्या मसाल्यांच्या साठ्यामध्ये हळद पावडर - ३३८ किलो (किंमत २,०२,८०० रुपये) कांदा-लसूण मसाला - ४८ किलो (किंमत १९,२०० रुपये) धणे पावडर - २८८ किलो (किंमत १,९५,२०० रुपये) सुपर मिक्स गरम मसाला - २१६ किलो (किंमत ७५,६०० रुपये) स्पेशल मिक्स काळा मसाला - ६६४ किलो (किंमत २,६६,४०० रुपये) काळा मसाला - ३३८ किलो (किंमत २,३६,६०० रुपये) आणि मिरची पावडर ३३८ किलो (किंमत २,७०,४०० रुपये) या पदार्थांचा समावेश आहे. नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या अशा भेसळ करणाऱ्या कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

# पाच हजारांची तुटपुंजी मदत नको; शेतकऱ्यांना ५० हजारांचा आधार द्या!

## दुष्काळग्रस्त आदिवासी शेतकऱ्यांची मागणी; सरसकट कर्जमाफी, आठ तास वीज आणि खावटी योजना सुरू करण्याची मागणी

राजूर (प्रतिनिधी) : महाराष्ट्रावर पुन्हा एकदा दुष्काळाचे गंभीर सावट निर्माण झाले असून, ग्रामीण आणि आदिवासी भागातील शेतकरी आर्थिक संकटाच्या उंबरठ्यावर उभे आहेत. पावसाने ओढ दिल्याने ओढे, नाले आणि झरे आटू लागले आहेत. पाणीसाठे झपाट्याने कमी होत असल्याने भात, सोयाबीन, नागली, वरई आणि भाजीपाला यांसह विविध पिकांवर संकट ओढवले आहे. हातातोंडाशी आलेले पीक पाण्याअभावी वाया जाण्याची भीती निर्माण झाल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. या पार्श्वभूमीवर पाच हजार रुपयांची तुटपुंजी मदत न देता प्रत्येक दुष्काळग्रस्त शेतकऱ्याच्या खात्यावर किमान ४० ते ५० हजार रुपयांची थेट आर्थिक मदत जमा करावी, अशी मागणी समाजसेवक अनंत घाणे यांच्यासह वारंघुशी येथील आदिवासी शेतकऱ्यांनी केली आहे.

आश्वासन नको, प्रत्यक्ष मदत हवी!

दुष्काळाची तीव्रता वाढत असताना शेतकऱ्यांना केवळ आश्वासनांवर अवलंबून ठेवू नये. शेतीतील पिकांचे नुकसान, पिण्याच्या पाण्याची टंचाई, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न आणि शेतीच्या वाढत्या खर्चामुळे ग्रामीण कुटुंबांचे आर्थिक गणित कोलमडण्याची भीती आहे. त्यामुळे शासनाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तातडीने ठोस निर्णय घ्यावेत आणि दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी करण्यात आली.

दुष्काळाची दाहकता कागदावर नाही, तर शेतकऱ्याच्या शेतात दिसत आहे. हातात आलेले पिवळे सोनं डोळ्यांदेखत हातातून जात आहे. त्यामुळे शासनाने तातडीने निर्णय घेऊन शेतकऱ्यांना प्रत्यक्ष आर्थिक मदत द्यावी, अशी भूमिका आदिवासी शेतकऱ्यांनी मांडली.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करताना पुढील मुद्दे मांडण्यात आले आहेत. प्रत्येक दुष्काळग्रस्त शेतकऱ्याच्या खात्यावर किमान ४० ते ५० हजार रुपयांची मदत जमा करावी. शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन सरसकट कर्जमाफी करावी आणि सातबारा कोरा करावा. प्रत्येक गावातील पाणीस्थितीचे सर्वेक्षण करून टँकर, विहिरी, बोअरवेल



आणि उपलब्ध जलस्त्रोतांचे आतापासून नियोजन करावे. दुष्काळग्रस्त भागात रोजगार हमीची कामे तातडीने सुरू करून शेतमजूर आणि ग्रामीण कुटुंबांना रोजगार उपलब्ध करून द्यावा. शेतीपंपांना किमान आठ तास नियमित थ्री-फेज वीजपुरवठा करावा.

खावटी योजना पूर्ववत करा : आदिवासी महामंडळामार्फत बंद करण्यात आलेली खावटी योजना पुन्हा कायमस्वरूपी सुरू करावी. आदिवासी भागातील शिक्षण, रोजगार, शेती, आरोग्य आणि सामाजिक कल्याणाशी संबंधित बंद अथवा रखडलेल्या योजना पूर्ववत कराव्यात.

दुष्काळ निवारणासाठी केवळ कार्यालयीन आकडेवारीवर अवलंबून न राहता प्रत्येक गावात प्रत्यक्ष पाहणी करावी, अशीही मागणी करण्यात आली. या सर्वेक्षणात पाण्याची उपलब्धता, जनावरांसाठी चारा, पिकांचे झालेले नुकसान, पशुधनाची संख्या, रोजगाराच्या संधी आणि कुटुंबांची आर्थिक परिस्थिती यांची नोंद घेऊन गावनिहाय अहवाल तयार करावा. या अहवालाच्या आधारे गरजू शेतकरी आणि कुटुंबांना तातडीने मदत उपलब्ध करून द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

समाजसेवक अनंत घाणे म्हणाले की, दुष्काळाचे संकट निर्माण झाल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा संकटाची चाहूल लागताच शासनाने पाणी, चारा, रोजगार आणि आर्थिक मदतीचे नियोजन करणे आवश्यक आहे. शेतकरी, शेतमजूर, आदिवासी आणि ग्रामीण जनतेला संकटाच्या काळात वाऱ्यावर सोडता कामा नये. शासनाने केवळ घोषणांपुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष मदत पोहोचवावी, अशी मागणी त्यांनी केली. या वेळी तुकाराम खाडे, सुनील पवार, मारुती खाडे, ठकेश कडाळी, रवी घाणे, एकनाथ घाणे, विश्वनाथ भागडे, अनंत मुठे, यमाजी कडाळी, सुरेश डगळे, संतु घाणे, दीपक भागडे, रामदास लांडगे, कानिफनाथ घाणे, लक्ष्मण भागडे, दिलीप भांगरे आणि वसंत सोनवणे यांच्यासह आदिवासी भागातील शेतकरी उपस्थित होते.

### दिनविशेष

२००९: — बगदाद, इराक येथे झालेल्या दोन आत्मघातकी बॉम्बहल्ल्यात १५५ जण ठार तर ७२१ जण जखमी झाले.

१९९९: — दक्षिण अफ्रिकेतील लेखक जे. एम. कोएत्झी यांना साहित्य क्षेत्रातील प्रतिष्ठेचे मानले जाणारे बूकर पारितोषिक दुसऱ्यांदा मिळाले.

१९९४: — ए. एम. अहमदी यांनी भारताचे २६ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.

१९६२: — युगांडाचा संयुक्त राष्ट्रांत (United Nations) प्रवेश.

१९५१: — स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्याच निवडणूकांना सुरुवात झाली.

१८६१: — टोरांटो स्टॉक एक्सचेंज सुरु झाले.

### जन्म

८४०: यकब इब्न अल-लेथ अल-सैफर — सफारीड राजघराण्याचे संस्थापक

१९५२: मिरियम स्पिटेरी डेबोनो — माल्टा देशाच्या ११व्या अध्यक्ष

१९४५: टेमसुला एओ — भारतीय कवी आणि लेखक (निधन: ९ ऑक्टोबर २०२२ )

१९४५: अपर्णा सेन — भारतीय अभिनेत्री, निर्माती आणि पटकथालेखिका — पद्मश्री, राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार

१९३७: डॉ. अशोक रानडे — संगीत समीक्षक (निधन: ३० जुलै २०११ )

१८८१: पाब्लो पिकासो — पाब्लो पिकासो (निधन: ८ एप्रिल १९७३ )

१८६४: जॉन फ्रान्सिस लबाडी — डॉज ऑटोमोबाईलचे सहसंस्थापक (निधन: १४ जानेवारी १९२० )

१८४३: पियरे लॅलेमेंट — सायकलचे शोधक (निधन: २९ ऑगस्ट १८९१ )

### मृत्यू

२०२५: सतीश शाह — भारतीय अभिनेते आणि विनोदी कलाकार (जन्म: २५ जून १९५१ )

२०२२: मोहम्मद अब्बास अन्सारी — भारतीय इस्लामिक धर्मगुरू आणि राजकीय कार्यकर्ते (जन्म: १७ ऑगस्ट १९३६ )

२०१२: जसपाल भट्टी — भारतीय अभिनेते — पद्म भूषण (जन्म: ३ मार्च १९५५ )

२००९: चित्तरंजन कोल्हटकर — अभिनेते (जन्म: १४ जानेवारी १९२३ )

२००३: हेमू अधिकारी — भारतीय क्रिकेटपटू (जन्म: ३१ जुलै १९१९ )

२००३: पांडुरंगशास्त्री आठवले — स्वाध्याय परिवाराचे संस्थापक, तत्त्वचिंतक आणि समाजसुधारक; भक्ती व सामाजिक परिवर्तनाचा संदेश — पद्मविभूषण, रॅमन मॅगसेसे पुरस्कार, धर्माच्या क्षेत्रातील प्रगतीसाठी टेम्पलटन पुरस्कार (जन्म: १९ ऑक्टोबर १९२० )

१९८०: साहिर लुधियानवी — शायर व गीतकार (जन्म: ८ मार्च १९२१ )

१९६०: हॅरी फर्ग्युसन — ट्रॅक्टरचे निर्माते (जन्म: ४ नोव्हेंबर १८८४ )

१९५५: पं. दत्तात्रय पलुसकर — शास्त्रीय गायक (जन्म: २८ मे १९२१ )

१८३३: अब्बास मिर्झा — काजर पर्शिया देशाचे राजपुत्र (जन्म: २६ ऑगस्ट १७८९ )

१६४७: इव्हानजेलिस्टा टॉरिसेली — हवादाबमापीचे (barometer) संशोधक (जन्म: १५ ऑक्टोबर १६०८ )

### आजचा सुविचार

**"यश मिळवण्यासाठी मोठी स्वप्ने पाहण्यापेक्षा, ती पूर्ण करण्यासाठी रोज प्रामाणिक प्रयत्न करणे अधिक महत्त्वाचे असते."**




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**२५ ऑक्टोबर**

## १९५१ : स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्याच सार्वत्रिक निवडणुकांना सुरुवात....

भारताच्या इतिहासात १९५१ हे वर्ष लोकशाहीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठरले. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला आणि देशाने लोकशाही शासनव्यवस्थेचा स्वीकार केला. स्वातंत्र्यानंतर देशासमोर लोकशाही बळकट करणे, संविधानाची अंमलबजावणी करणे आणि जनतेच्या सहभागातून सरकार स्थापन करणे ही मोठी आव्हाने होती. या पार्श्वभूमीवर भारतात पहिल्या सार्वत्रिक निवडणुकांची प्रक्रिया १९५१ मध्ये सुरू झाली. या निवडणुका म्हणजे भारतीय लोकशाहीची पहिली मोठी परीक्षा होती.२६ जानेवारी १९५० रोजी भारतीय संविधान लागू झाले आणि भारत प्रजासत्ताक बनला. संविधानाने प्रत्येक प्रौढ नागरिकाला धर्म, जात, लिंग, भाषा किंवा आर्थिक स्थितीचा भेद न करता मतदानाचा अधिकार दिला. त्या काळात अनेक देशांमध्ये मतदानाचे अधिकार मर्यादित होते; परंतु भारताने सुरुवातीपासूनच सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराचा स्वीकार करून लोकशाहीतील समानतेचे महत्त्व अधोरेखित केले. सुरुवातीला २१ वर्षे पूर्ण केलेल्या नागरिकांना मतदानाचा अधिकार होता. आज हा वयोगट १८ वर्षे आहे.या ऐतिहासिक निवडणुकीची जबाबदारी पार पाडण्यासाठी भारतीय निवडणूक आयोगाची स्थापना २५ जानेवारी १९५० रोजी करण्यात आली. सुकुमार सेन हे भारताचे पहिले मुख्य निवडणूक आयुक्त होते. देशातील कोट्यवधी नागरिकांची मतदारयादी तयार करणे, मतदान केंद्रे उभारणे, निवडणूक कर्मचारी नेमणे आणि संपूर्ण प्रक्रिया निष्पक्षपणे पार पाडणे ही प्रचंड मोठी कामे होती. त्या वेळी भारतात सुमारे १७ कोटी ३० लाख मतदार नोंदणीस पात्र होते. त्यांपैकी मोठ्या संख्येने नागरिक निरक्षर असल्यामुळे निवडणूक चिन्हांचा वापर करण्यात आला. त्यामुळे उमेदवारांची ओळख पटवणे आणि मतदान करणे मतदारांना सोपे झाले.पहिल्या सार्वत्रिक निवडणुका २५ ऑक्टोबर १९५१ रोजी सुरू झाल्या आणि २१ फेब्रुवारी १९५२ पर्यंत टप्प्याटप्प्याने पार पडल्या. लोकसभेच्या ४८९ जागांसाठी सुमारे १,८७४ उमेदवार निवडणूक रिंगणात होते. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे नेतृत्व पंडित जवाहरलाल नेहरू करत होते. काँग्रेससह समाजवादी पक्ष, भारतीय कम्युनिस्ट पक्ष आणि इतर अनेक राजकीय पक्षांनी निवडणुकीत सहभाग घेतला. मतदानासाठी त्या काळी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे नव्हती. प्रत्येक उमेदवारासाठी स्वतंत्र मतपेटी ठेवली जात असे आणि मतदार आपल्या पसंतीच्या उमेदवाराच्या मतपेटीत मतपत्रिका टाकत असत. Digital Sansad+2या निवडणुकीत भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने मोठे यश मिळवले. लोकसभेच्या ४८९ जागांपैकी ३६४ जागा काँग्रेसने जिंकल्या.

## हेमू अधिकारी — भारतीय क्रिकेटचा एक निष्ठावंत सेवक

**पुण्यतिथी विशेष**

हेमू अधिकारी हे भारतीय क्रिकेटच्या इतिहासातील एक महत्त्वाचे क्रिकेटपटू होते. त्यांचे पूर्ण नाव हेमचंद्र रामचंद्र अधिकारी असे होते. त्यांचा जन्म ३१ जुलै १९१९ रोजी पुणे येथे झाला. त्यांनी आपल्या उत्कृष्ट फलंदाजी, शिस्तबद्ध खेळ आणि नेतृत्वगुणांच्या जोरावर भारतीय क्रिकेटमध्ये विशेष स्थान मिळवले. क्रिकेटबरोबरच त्यांनी भारतीय लष्करातही सेवा बजावली.हेमू अधिकारी यांना लहानपणापासून क्रिकेटची आवड होती. मेहनत, सराव आणि खेळाप्रती असलेल्या निष्ठेमुळे त्यांनी क्रिकेटमध्ये प्रगती केली. त्यांनी १९३६-३७ च्या हंगामात प्रथमश्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पण केले. त्यानंतर त्यांनी विविध संघांकडून सामने खेळत आपली गुणवत्ता सिद्ध केली.२८ नोव्हेंबर १९४७ रोजी त्यांनी ऑस्ट्रेलियाविरुद्ध ब्रिस्बेन येथे भारतीय संघाकडून कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण



केले. त्या काळात भारतीय क्रिकेट संघ आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले स्थान मजबूत करण्याचा प्रयत्न करत होता. अशा परिस्थितीत हेमू अधिकारी यांच्यासारख्या अनुभवी आणि तंत्रशुद्ध खेळाडूंचे योगदान महत्त्वाचे होते.हेमू अधिकारी यांनी आपल्या कसोटी कारकिर्दीत एकूण २१ सामने खेळले आणि ८७२ धावा केल्या. कसोटी क्रिकेटमधील त्यांची सर्वोच्च धावसंख्या नाबाद ११४ होती. त्यांनी वेस्ट इंडिजविरुद्ध दिल्ली येथे ही शतकी खेळी केली. त्यांची फलंदाजी संयमी आणि तंत्रशुद्ध होती. कठीण परिस्थितीतही शांतपणे खेळून संघाला मदत करण्याची त्यांची क्षमता उल्लेखनीय होती. फलंदाजीबरोबरच ते गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षणातही योगदान देत असत.१९५२ मध्ये पाकिस्तानविरुद्धच्या एका कसोटी सामन्यात हेमू अधिकारी यांनी गुलाम अहमद यांच्यासोबत शेवटच्या विकेटसाठी १०९ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी केली. या भागीदारीमुळे भारतीय संघाला कठीण परिस्थितीतून बाहेर पडण्यास मदत झाली. त्यांच्या या खेळीवरून त्यांची जिद्द आणि संघासाठी लढण्याची वृत्ती दिसून आली.१९५८-५९ च्या हंगामात त्यांनी वेस्ट इंडिजविरुद्धच्या एका कसोटी सामन्यात भारतीय संघाचे नेतृत्व केले. त्यांच्या नेतृत्वामध्ये शिस्त, संयम आणि संघभावनेला महत्त्व होते. खेळाडू म्हणून कारकीर्द संपल्यानंतरही त्यांनी भारतीय क्रिकेटशी असलेले नाते कायम ठेवले. त्यांनी क्रिकेटपटूंना मार्गदर्शन केले आणि भारतीय संघाच्या यशात योगदान दिले.१९७१ मध्ये अजित वाडेकर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने इंग्लंडमध्ये ऐतिहासिक कसोटी मालिका जिंकली. या दौऱ्यात हेमू अधिकारी यांनी संघव्यवस्थापक म्हणून काम पाहिले. त्यांचा अनुभव आणि मार्गदर्शन भारतीय संघासाठी उपयुक्त ठरले. भारतीय क्रिकेटमधील त्यांच्या योगदानाची दखल घेऊन १९९८ मध्ये त्यांना बीसीसीआयचा कर्नल सी. के. नायडू जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
ताम्हाणे हॉस्पिटल
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2026-28

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



## सोनेवाडीच्या विकासासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही - आ. खताळ



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- राजकारण हे केवळ निवडणुकीपुरते करायचे असते; इतर वेळी जनतेच्या विकासासाठी काम करायचे असते. लोकप्रतिनिधी म्हणून गावातील नागरिकांच्या सुख-दुःखात सहभागी होणे, त्यांच्या मूलभूत समस्या सोडविणे आणि तरुणांच्या हाताला रोजगार उपलब्ध करून देणे, हीच माझी प्राथमिकता आहे. सोनेवाडी ग्रामस्थांनी वाचनालयासाठी जागा उपलब्ध करून द्यावी. वर्षभराच्या आत येथे वाचनालयाची इमारत उभारून विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका सुरू करण्याची जबाबदारी मी घेतो. गावाच्या विकासकामांसाठी निधीची काळजी करू नका, अशी ग्वाही आमदार अमोल खताळ यांनी दिली.

संगमनेर तालुक्यातील सोनेवाडी येथे सुमारे एक कोटी ३८ लाख रुपयांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण आमदार खताळ यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर भाजप जेष्ठ नेते भीमराज चत्तर, निमोण सरपंच संदीप देशमुख, शिवसेना तालुका प्रमुख राजेंद्र सोनवणे, श्रीकांत गोमासे, हरीशचंद्र चकोर, संपत फड, , पांडुरंग गोमासे, राहुल गोमासे, सुधीर घुगे, सुवर्णा सांगळे, गणेश सानप, गोरख गाडेकर, अमोल अंधाळे, रणजित जाधव, योगेश डोंगरे, आकाश सानप आदी सह महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थिती होणार आहे.

आमदार खताळ म्हणाले की, आपण आमदार झाल्यानंतर सोनेवाडी गावातील विविध विकासकामांसाठी सुमारे एक कोटी ३९ लाख ६४ हजार रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. ग्रामपंचायतीच्या मागील साडेतीन वर्षांच्या कार्यकाळात मिळालेला निधी यापेक्षा वेगळा आहे. छोट्या गावाला एवढ्या मोठ्या प्रमाणावर निधी मिळणे, ही समाधानाची बाब आहे.पूर्वी टँकरने पाणी आणणे, पाण्याचे पूजन करणे आणि निवडणुकीनंतर पुन्हा त्याच समस्येला सामोरे जाणे, असे चित्र अनेक वर्षे होते. मात्र, आपण आमदार झाल्यानंतर योगायोगाने जलसंपदा खाते राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे आले. त्यांच्याकडे पाठपुरावा करून मागील वर्षी चारीच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून घेतला. अनेक अडचणींवर मात करून तळेगावच्या माथ्यापर्यंत पाणी पोहोचविण्याचा प्रयत्न केला. आता भोजापूर चारीच्या कामासाठी ४५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. या चारीच्या रुंदीकरणाची मागणीही शेतकऱ्यांकडून होत आहे. शेतकरी आणि ग्रामस्थांची मागणी लक्षात घेऊन जलसंपदामंत्र्यांच्या उपस्थितीत मुंबईत बैठक घेऊन याबाबत सकारात्मक निर्णय होण्यासाठी प्रयत्न करणार आहे.

केवळ भोजापूर धरण ओव्हरफ्लो झाल्यानंतरच या भागातील गावांना पाणी मिळावे, अशी परिस्थिती कायम राहू नये. कमी पाऊस झाल्यास पाणी पोहोचण्यास विलंब होतो. त्यामुळे निमोण-तळेगावसह पाण्यापासून वंचित असलेल्या परिसराचा नदीजोड प्रकल्पात समावेश करण्यासाठी प्रयत्न केले आहेत. या माध्यमातून भविष्यात पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करणार आहे. तालुक्यातील तरुणांना नोकरीसाठी पुणे-मुंबईकडे जावे लागू नये, तर स्थानिक पातळीवरच रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी औद्योगिक विकासावर भर देणार आहे.

पान १ वरून

### लहामटे विरूद्ध...

मागील दोन विधानसभा निवडणुका, अगस्ती कारखान्यासह तालुक्यातील सहकारी संस्था आणि नगरपंचायत निवडणुकीत हे दोघे एकत्र होते. विजयादशमीच्या दिवशी अगस्ती कारखान्याच्या मोळी टाकण्याच्या कार्यक्रमातही ते एकाच व्यासपीठावर दिसले होते. मात्र जिल्हा बँकेच्या निवडणुकीमुळे या दोघांमध्ये दुरावा निर्माण झाला असून, समाजमाध्यमांवर त्यांच्या समर्थकांकडून आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडू लागल्या आहेत. आमदार डॉ. किरण लहामटे यांनी अनुसूचित जाती-जमाती मतदारसंघातील अर्ज मागे घेत सोसायटी मतदारसंघातील आपला अर्ज कायम ठेवला आहे. तर, माजी आमदार वैभवराव पिचड यांनीही अनुसूचित जाती-जमाती मतदारसंघातील अर्ज कायम ठेवत इतर अर्ज मागे घेतले आहेत. आता त्यांची लढत प्रशांत लोखंडे यांच्याशी होणार आहे. दुष्काळी परिस्थितीत निवडणूक बिनविरोध करण्यासाठी विखे - थोरात नेत्यांनी शेवटच्या क्षणापर्यंत प्रयत्न केले, मात्र त्यात यश आले नाही.

## प्रवरा नदीत बुडालेल्या युवकाचा शोध सुरूच

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - अकोले तालुक्यातील सुगाव बुद्रुक येथील प्रवरा नदीपात्रात बुडालेल्या २५ वर्षीय युवकाचा ३० तास उलटूनही अद्याप शोध लागलेला नाही. बेपत्ता युवकाचा शोध घेण्यासाठी त्याचे आई-वडील कालपासून नदीकिनारी थांबून आहेत. निळवंडे धरणातून शेतीसाठी पाण्याचे आवर्तन सुरू असल्याने नदी दुथडी भरून वाहत आहे. त्यामुळे शोधकार्यात अडथळे येत असून, बेपत्ता युवकाचा शोध घेणे शक्य व्हावे यासाठी धरणाचे आवर्तन दोन-तीन तास थांबविण्याची मागणी केली जात आहे. गुरूवारी दुपारी बारा वाजेच्या सुमारास रोकडोबा जवळील प्रवरा नदीपात्रात बाळू अशोक शिंदे (वय ३८) हे पोहण्यासाठी गेले होते. पाण्याचा अंदाज न आल्याने ते बुडू लागल्याने त्यांना वाचविण्यासाठी आकाश पोपट पथवे (वय २५) याने नदीत उडी घेतली, मात्र तोही वाहून गेला. या दोघांना वाचविण्यासाठी आकाशचा भाऊ सूरज पोपट पथवे (वय २१) यानेही पाण्यात उडी मारली, मात्र सुदैवाने तो यातून बचावला. या घटनेत बाळू शिंदे यांचा बुडून मृत्यू झाला असून, त्यांचा मृतदेह कालच सापडला आहे. मात्र आकाश पथवे याचा अद्याप शोध लागलेला नाही.




आकाशचा शोध घेण्यासाठी त्याचे आई-वडील नदीच्या कडेने फिरत आहेत. आपत्कालीन परिस्थितीसाठी अकोले येथे बचाव पथक किंवा आवश्यक साहित्य कधी उपलब्ध होणार, असे प्रश्न नागरिकांकडून समाजमाध्यमांवर विचारले जात आहेत. कॅमेऱ्यांच्या निवासी नायब तहसीलदार किसन लोहरे यांनी सांगितले की, महसूल प्रशासनाकडून सध्या ड्रोन साहाय्याने शोधकार्य सुरू आहे. घटनास्थळी मंडलाधिकारी शरदचंद्र नांगरे, तलाठी तिकांडे, पोलीस पाटील राजेंद्र शिंदे आणि महसूल विभागाचे पथक उपस्थित आहे. सध्यातरी एनडीआरएफ किंवा इतर कोणत्याही बचाव पथकाला पाचारण करण्यात आलेले नाही. गेल्या वर्षी याच परिसरात तीन जवानांचा बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली होती, त्याच्या आठवणी या निमित्ताने पुन्हा ताज्या झाल्या आहेत.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ | * कर्ज व्याजदर कमी | * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड , तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

## निळवंडेचे आवर्तन ४० दिवसांपासून सुरूच; साडेचार टीएमसी पाण्याची उधळपट्टी

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - मागील ४० दिवसांपासून सुरू असलेले निळवंडे धरणाचे आवर्तन अद्याप बंद न झाल्याने जवळपास साडेचार टीएमसी (४ हजार ४१० दलघफू) पाण्याचा वापर झाला आहे. पाण्याच्या या उधळपट्टीवरून अकोले तालुक्यात तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

मध्यंतरी सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या उपस्थितीत जलसंपदा अधिकाऱ्यांना धारेवर धरत आवर्तन तातडीने बंद

करण्याची मागणी केली होती. तसेच तालुक्यातील उच्चस्तरीय कालव्याचे आवर्तन सुरू करण्यासाठी प्रसंगी निळवंडेचे चाक बंद करण्याचा इशाराही दिला होता. मात्र, या मागणीचा कोणताही परिणाम झाला नसून पाण्याचा विसर्ग सुरूच आहे.

भंडारदरा लाभ क्षेत्रासाठी १४ सप्टेंबरपासून निळवंडे धरणातून प्रवरा नदीपात्रात पाणी सोडले जात आहे. सुरुवातीला धरण भरलेले असल्याने आणि भंडारदरातून येणाऱ्या पाण्यामुळे पातळी टिकून होती. मात्र, आता साठा झपाट्याने कमी होत आहे. ८ हजार ३३४ दलघफू क्षमतेच्या निळवंडे धरणातील साठा आता ५ हजार दलघफू (५९.९९ टक्के) राहिला आहे. सध्या धरणातून ११०० क्युसेकने पाणी सोडले जात आहे.

केवळ अकोले तालुक्यासाठी असणाऱ्या निळवंडेच्या उच्चस्तरीय कालव्यातून १ सप्टेंबरला आवर्तन सुरू झाले होते. निळवंडेची पाणी पातळी कमी झाल्यामुळे २६ ऑक्टोबरला ते बंद करण्यात आले. या कालावधीत सुमारे ८० दलघफू पाण्याचा वापर झाला. या कालव्यांसाठी २७४ दलघफू पाणी मंजूर आहे. उच्चस्तरीय कालवे पुन्हा सुरू करण्यासाठी भंडारदरा धरणातून पाणी सोडून निळवंडेची पाणी पातळी वाढवणे आवश्यक आहे. मात्र, भंडारदरात ११ टीएमसी (९९.६५ टक्के) पाणीसाठा असूनही अद्याप पाणी सोडण्यात आलेले नाही.




चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड | रत्नागिरी | सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

दुर्शन टेक्सटाईल मार्केट
सेल... सेल... सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
शालू | कांजीवरम | सिल्क पैठणी | बनारसी
आकर्षक साड्यांची असंख्य रेंज..
संपर्क :- 8390005001
पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिश्रमनाय्
KH
कुटे हॉस्पिटल
अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
- सर्जरी विभाग
- अतिदक्षता विभाग
- अपघात विभाग
- डायलिसीस विभाग
- सुपर स्पेशालिटी विभाग
- न्यूरोविभाग
- हृदयरोग विभाग
- मेडिसीन विभाग
- अद्ययावत कॅथलॅब
- जॉईंट रिप्लेसमेंट
- स्पाईन सर्जरी
- मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25